पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.११/०९/२०१९

## दि.१०/०९/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ३५५/१९,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२५ वर्षे,रा.गणेशनगर,वडगाव-शेरी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०९/२०१९ रोजी दुपारी १२/१५ वा.ते १८/१५ वा.चे दरम्यान फिर्यादी यांचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील रोख ३ हजार रूपये व सोन्याचे दागिने असा एकुण एकुण १,३०,९२०/- रुपये किंचा किचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | म.सहा.पो.निरी. विद्युल्लता चव्हाण ९०११४९१९१४ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ४९९/१९,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,१३२(१)(अ)/१७९,११९/१७७ |
| **फिर्यादी** | राकेश वाधवा,वय-४० वर्षे,रा.एन.आय.बी.एम.रोड,कोंढवा,पुणे |
| **आरोपी** | चारचाकी टेम्पोसोबत ट्रॉलीवरील अज्ञात चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०९/२०१९ रोजी १४/०० वा. सांळुखे विहार रोड ते संविधान चौक या रस्त्यावरील स.नं.११/१२,केदारी नगर,वानवडी,पुणे येथील साई ॲटो गॅरेज दुकाना समोर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे मामा वासुदेव आनंदराम चिजवानी,वय-६५,रा.कुमार प्रसन्ना सोसायटी, वानवडी,पुणे हे मोटार सायकलवरून जात असताना,यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील चारचाकी टेम्पोसोबत असलेली ट्रॉली ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने, अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी वासुदेव आनंदराम चिजवानी यांस जबर ठोस मारून,त्यांचा तोल जावुन ते रोडवर पडल्याने त्यांचे डोक्यास व खांदयाला मार लागुन, टेम्पो सोबतचे ट्रॉलीचे मागचे चाक त्यांचे डोक्यावरुन गेल्याने,त्यामध्ये ते गंभीर जखमी होवुन,वासुदेव चिजवानी यांचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता, अपघाताची खबर न देता पळुन गेला. (वासुदेव चिजवानी यांनी डोक्यावर हेल्मेट घातले नव्हते.) |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. शेटे ९१५८८११६६६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे ३१६/१९,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | दिपक घोरतळे,वय-२८,रा.अहमदनगर |
| **आरोपी** | अज्ञात व्यक्ती (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०९/२०१९ रोजी १२/०० वा. बेलबाग चौकात शिवाजी रोडवर पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे दगडुशेठ हलवाई गणपतीचे दर्शन घेवुन पायी जात असताना,कोणीतरी अज्ञात व्यक्तीने गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे पॅन्टचे खिशातील रोख १० हजार रूपये रक्कम चोरी करून नेले आहेत. |
| **त.अंमलदार** | म.सहा.पो.निरी. ए.बी.खेतमाळीस ९८२२३८५२२२ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे ३७२/१९,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-५०,रा.मरकळ गांव,ता.खेड,जि.पुणे |
| **आरोपी** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०९/२०१९ रोजी १३/४५ वा. रेल्वे स्टेशन जवळील पीएमपी बस थांबा जवळ आळंदीकडे जाणा-या बस मध्ये चढताना |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया मुंबईवरून खाजगी वाहनाने पुणे रेल्वे स्टेशन येथे येवुन,रेल्वे स्टेशन जवळील पीएमपी बस थांब्या जवळ आळंदीकडे जाणा-या बस मध्ये प्रवास करण्यासाठी चढत असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचेजवळील रॅक्झीनचे बॅगेतील रोख २ लाख रूपये चोरी करून नेले आहेत. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. जे.एम.पाटील ९५९४०००११८ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**